दैनिक अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३१६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१० फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबई महानगरपालिकेवर प्रशासक नेमणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची मुदत ७ मार्च २०२२ रोजी संपत आहे. परंतू राज्यात कोविडची आपत्ती त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदस्य संख्येत केलेली वाढ आणि त्यामुळे झालेली प्रभागांची पुनर्रचना यामुळे ही निवडणूक घेणे शक्य होणार नसल्याने प्रशासक नियुक्ती करण्याची सूचना राज्य निवडणूक आयोगाने केली होती. सद्यस्थितीत प्रशासक नियुक्तीबाबत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये कोणतीही तरतूद नाही, त्यामुळे ही सुधारणा करण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्यात येईल. प्रशासकाची नियुक्ती ही आगामी सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणाऱ्या महानगरपालिकेच्या पहिल्या सभेच्या दिनांकापर्यंत लागू राहील.

# चोरी झाल्याचा बनाव करणाराच निघाला आरोपी

### आरोपीकडून ५ लाख ७५ हजारांची रोख रक्कम पनवेल तालुका पोलिसांनी केली हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील मुंबई – गोवा महामार्गावर जबरी चोरी झाल्याचे भासवुन बनाव करणाऱ्या टेम्पो ड्रायव्हरला २४ तासाच्या आत पनवेल तालुका पोलीसांकडुन अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून पोलिसांनी ५ लाख ७५ हजारांची रोख रक्कम हस्तगत केली आहे. नवी मुंबई परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौडकर, पोलीस निरीक्षक अंकुश खेडकर (गुन्हे), सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरिक्षक संजय गळवे यांच्यासह पथकाने कौशल्यपूर्ण तपास करून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास पनवेल तालुका पोलीस ठाणे हे करीत आहेत.




सोमवारी (दि.७ फेब्रुवारी) दुपारी १:१५ वाजण्याच्या सुमारास जैसराज यादव (वय २४) कामोठे टोलनाका येथुन टेम्पोने माणगावकडे प्रवास करीत असताना दुपारी ०२.१५ वाजण्याच्या सुमारास मुंबई – गोवा महामार्गावरील कर्नाळा खिंडीच्या उतारावर पोहोचल्यावर टेम्पोमागुन येणाऱ्या दोन अनोळखी मोटारसायकलस्वारांनी जैसराज यादव यांच्या टेम्पोला अडवुन, त्यांना चाकुचा धाक दाखवला व टेम्पोतील केबिनमध्ये ड्रायव्हरच्या सीटखाली ठेवलेली ५ लाख ७५ रुपये रोख रक्कम, मोबाईल व चावी असा एकुण ५ लाख ७६ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरी करून पळून गेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने तपास पथकाने घटनास्थळी भेट दिली असता घटनास्थळ हे कर्नाळा अभयारण्य पर्यटन स्थळाजवळील वर्दळीचे असल्याचे दिसून आले. त्यामुळे याठिकाणी कायम पर्यटकांची गर्दी असते. तसेच याठिकाणच्या महामार्ग परिसरात हॉटेल व्यवसाय देखील मोठया प्रमाणात असल्याने लोकांची तसेच वाहनांची ये–जा मोठया प्रमाणात होत असल्याचे पोलीस पथकाच्या निदर्शनास आले. त्यातच जबरी चोरीची वेळ ही भर दिवसा दुपारची असुन गुन्हा घडताना किंवा गुन्हा घडल्यानंतर फिर्यादीने कोणत्याही प्रकारे आरडाओरड केली नाही. तसेच फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, चोरी करणारे मोटारसायकलस्वार हे पुढे जावुन यु–टर्न घेऊन पुन्हा पनवेलजवळील पळस्पेच्या दिशेने गेले असल्याचे सांगितले. परंतु सदरचा रस्ता वळणा–वळणाचा असल्याने युटर्न हा घटनास्थळापासुन अंदाजे १ किमी अंतरावर कल्हे फाटा येथे आहे. त्यामुळे फिर्यादीच्या बोलण्यात मोठी तफावत दिसून येत असल्याने पोलिसांना संशय आला. त्यामुळे कामोठे टोलनाका ते घटनास्थळापर्यंतच्या सी.सी.टी.व्ही. फुटेजची तपासणी केली असता फिर्यादीने नमुद केलेल्या वर्णनाची मोटारसायकल व मोटारसायकलस्वार हे दुपारी १ ते २:३० वाजेपर्यंत त्याठिकाणी दिसून आले नाहीत. तसेच फिर्यादीने रोख रक्कम नेमकी कुठे ठेवली होती? याबाबत चौकशी केली असता फिर्यादी हे रोख रक्कम कधी केबीनमध्ये, कधी चादरीखाली, तर कधी डॅशबोर्डमध्ये तर कधी सीटखाली ठेवली होती असे सांगू लागले.

एकंदरीत फिर्यादीच्या संशयास्पद वर्तनावरून व हालचालींवरून फिर्यादी स्पष्टपणे खोटे बोलत असल्याचे निष्पन्न होत असल्याने पोलीस पथकाने फिर्यादीला विश्वासात घेवून अधिक चौकशी केली असता फिर्यादीचे मुळ मालक अवधेश कुमार सिंग यांना खोटी माहिती देवून पैशाच्या लालसेपोटी पोलिसांना खोटी फिर्याद दिल्याचे मान्य केले. आरोपी यादव याने सदरची रोख रक्कम ही अपहार करण्याच्या उद्देशाने व त्या रक्कमेतुन गावी घर बांधायचे असल्याचे सांगितले असून सदरचा बनाव रचल्याचे मान्य केले.

## आजपासून पुन्हा आंबेत-म्हाप्रळ पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ; पर्यटनावर होणार परिणाम

### पुलाच्या कामात तांत्रिक अडचणीमुळे पूल अवजड वाहनांसाठी बंद करण्याचा निर्णय



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेला आंबेत सावित्री पूल मागील जून महिन्या मध्ये सर्व प्रवाशांसह इतर अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी देखील सुरू करण्यात आलं मात्र पुन्हा एकदा पुलाच्या मुख्य पिल्लर ची बाजू कमकुवत असल्याचं आढळून आल्या नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने पुन्हा एकदा आंबेत म्हाप्रल सावित्री पूल बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

संरचना या कंपनीने हे काम हाती घेतले असून नुकतंच पुलाच्या मुख्य पिल्लर असलेल्या आतील बाजूंची मजबुती कमकुवत आढळून आल्याची माहिती निदर्शनात आल्यानंतर संबंधित अधिकारी वर्गाकडून सदर पूल बंद करत असल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधींशी वार्तालाप करताना सांगण्यात आली आहे त्यामुळे पुलावरून अवजड वाहतूक करणाऱ्या प्रवाशी वर्गाला तूर्तास ब्रेक घ्यावा लागणार असून हा प्रवास पुन्हा प्रवाशांना मुंबई गोवा हायवे,महाड ,दादली, चिंभावें, म्हाप्रल मार्गे असा उलट दिशेने करावा लागणार आहे यामुळे प्रवाशी वर्गाची मोठी डोकेदुखी वाढली आहे. दुसरीकडे मागील काही दिवसांपूर्वी बंद करण्यात आलेला टोल पूल देखील सर्व वाहतुकीसाठी पूर्णतः बंद ठेवण्यात आलाय त्यामुळे आंबेत दिशेकडून दापोली मंडणगड दिशेला प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये आता मोठी चिंतेची बाब पसरली आहे. पर्यायी वाहतुकीसाठी पुन्हा एकदा रोरो सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी होताना दिसत आहे. पुलावरून लहान वाहनांना जसे की मोटरसायकल, छोटी चार चाकी वाहने मात्र सुरूच राहणार आहेत अशी माहिती संबंधित वर्गाकडून सांगण्यात आली आहे.

> आंबेत सावित्री खाडीवरील पुलाचे काम गेली दोन वर्षांपासून डागडुजी करिता सुरू असून दोन वर्ष प्रवाशी वर्गाला नाहक त्रास सहन करावा लागला,मात्र दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पूल पुनः सुरू करून अवघ्या काही महिन्यातच पूल असुरक्षित असल्याची बाब संबंधित अभियांत्रिकी विभागाच्या लक्षात आल्यानंतर हा पूल पुन्हा अवजड वाहतुकीसाठी बंद करण्यात येतोय यावरून पुलाच्या कामात हलगर्जी-पणा दिसून येतोय यात तिळमात्र शंखा नाही,संबंधितविभागाच्या अधिकारी वर्गाने लवकरात लवकर हा प्रकार सुधारून पूल वाहतुकीसाठी सुरू करावा अन्यथा आंदोलन करावं लागेल.
>
> **(शेखर सावंत- मनसे माजी संपर्क अध्यक्ष म्हसळा श्रीवर्धन)**

## संक्षिप्त...

### मुंबईत लतादीदींच्या नावाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगीत महाविद्यालय : उदय सामंत

**दै.रायगड नगरी । पुणे**

मास्टर दिनानाथ मंगेशकर संगीत महाविद्यालयाऐवजी आता मुंबईत भारतरत्न लता दिनानाथ मंगेशकर संगीत या नावाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगीत महाविद्यालय उभारण्याचा निर्णय राज्य शासनातर्फे घेण्यात आला आहे,अशी घोषणा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी पुण्यात पत्रकार परिषदेत केली. त्याचप्रमाणे या महाविद्यालयात लता मंगेशकर यांच्या नावाने याच महाविद्यालयात मोठे संग्रहालय उभे केले जाईल,असेही सामंत यांनी यावेळी नमूद केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध कामांचा आढावा घेतल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत उदय सामंत बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार उपस्थित होते.

सामंत म्हणाले,मास्टर दिनानाथ मंगेशकर संगीत महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने मुंबई विद्यापीठात संगीत महाविद्यालय स्थापन करण्याचा अहवाल दिला होता. मात्र, दूर्दैवाने मुंबई विद्यापीठातील जागा या महाविद्यालयाला मिळू शकली नाही. त्यामुळे विद्यापीठाजवळील तंत्र शिक्षण विभागाची तीन एकर जागा या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.तसेच समितीने केलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयाचे नाव बदलण्यात आले आहे.

## जोरदार वाऱ्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील मच्छीमारी संकटात ; मच्छिमारी नौका किनाऱ्यावरती नांगरल्या

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

दरवर्षी पावसाळा सुरू झाल्यानंतर १ जून ते ३१ जुलै पर्यंत मच्छीमारी करण्यासाठी शासनाची बंदी असते. परंतु ३१ जुलैला बंदी उठल्यानंतर खराब हवामानामुळे मच्छीमारांना अद्यापही हवी तशी मच्छी पकडता आलेली नाही. पूर्वी मच्छिमारी नौका मच्छीमारी करण्यासाठी समुद्रामध्ये चार ते पाच दिवस बर्फ व तत्सम साहित्य घेऊन जात असत. परंतु यावर्षी हवामान खराब होत असल्यामुळे बोटी सकाळी जाऊन सायंकाळी परत येत आहेत. अनेक वेळा बोटीमध्ये भरलेल्या डिझेलचे पैसे सुद्धा वसूल होत नसल्याचे मच्छीमार बांधवांचे म्हणणे आहे.

नारळी पौर्णिमेला समुद्राला नारळ अर्पण केल्यानंतर खऱ्या अर्थाने मच्छिमार बांधव आपल्या बोटी मच्छीमारीसाठी समुद्रामध्ये ढकलतात. यावर्षीदेखील समुद्राला नारळ अर्पण केल्यानंतर बोटी मच्छिमारीसाठी समुद्रात ढकलल्या. परंतु सातत्याने हवामानात होणारे बदल कमी दाबाचे पट्टे व पावसाचा इशारा यामुळे मच्छीमारी हंगाम पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. मागील चार–पाच दिवसांपासून भारताच्या उत्तर पूर्व भागात बर्फाळ वादळ सुरू असून त्याचा परिणाम महाराष्ट्रातही दिसत आहे. सध्या उत्तर दिशेकडून दक्षिण दिशेकडे जोरदार वारे वाहत असून त्याचा परिणाम मच्छीमारी वरती झालेला पाहायला मिळत आहे.

जोरदार वाऱ्यासह समुद्रामध्ये लाटा देखील उसळत असल्याने मच्छीमारांना मच्छिमारी करणे अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे बहुतांश मच्छीमारांनी आपल्या बोटी समुद्रकिनारी नांगरून ठेवल्या आहेत. अजून पाच ते सहा दिवस वातावरण असेच राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. त्यामुळे मच्छीमारी सुरू होण्यास अद्यापही आठ दिवसांचा कालावधी लागेल असे मच्छिमार बांधवांमधून बोलले जात आहे.

## पनवेल न्यायालय परिसरातील वाहतूक कोंडी फुटणार

### न्यायालयासमोरील रस्त्यावर चारचाकींना पार्किंग करण्यास सक्त मनाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील जिल्हा सत्र न्यायालयासमोरील परिसर कायम वाहनांच्या गरड्याने घेरलेला दिसून येतो. त्यामुळे याठिकाणी न्यायालयीन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांना व या मार्गावरून ये–जा करणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. पनवेल शहर वाहतुक शाखेच्या हद्दीतील जिल्हा सत्र न्यायालय लोखंडीपाडा व अशोकबाग आणि पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणा–या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी चारचाकी वाहनांना (कार्यालयीन कामकाजाचे दिवशी) नो पार्कंग करणे आवश्यक आहे. त्यामुळे पनवेल न्यायालयाच्या मार्गावर चारचाकी वाहनांना सोमवार ते शुक्रवार म्हणजेच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी 'नो पार्कंग' बाबत आणि दुचाकी वाहनांना



'सम विषम पार्कंग' बाबतची अधिसुचना घोषित करण्यात आली आहे.

पनवेल शहरातील जिल्हा सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाजासंबधित येणाऱ्या विविध व्यक्तींची चारचाकी वाहने व दुचाकी वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूस पार्किंग केली जातात. त्यातच न्यायालयाच्या आजुबाजुला असलेले हॉस्पीटल व शासकीय कार्यालये या ठिकाणी लोकांची वर्दळ जास्त असल्याने त्याचा थेट परिणाम न्यायालयाच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर होतो. न्यायालयासमोरील रस्त्याची लांबी व रुंदी याचा विचार करता सदर मार्गावर नो पार्कंग करणे आवश्यक बाब आहे. परिणामी आणीबाणीच्या वेळी रुग्णवाहीका, अग्नीशमन अशा अत्यावश्यक सेवा असलेल्या

.../२

## नगरसेवक निधीतून बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी महाविकास आघाडीच्या नगरसेवकांच्या नगरसेवक निधीतून बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन रोजी पार पडले.

विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून पनवेल शहरातील पयोनियर, पाण्याच्या टाकी शेजारी, बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर यांच्या नगरसेवक निधीतून प्रभाग क्र.१८ येथे विविध ठिकाणी उभारलेल्या हायमास्ट चे लोकार्पण, नगरसेविका कुसुम गणेश पाटील यांच्या नगरसेवक निधीतून खांदा कॉलनी येथील सेक्टर ६, विरंगुळा केंद्र, अष्टविनायक हॉस्पिटल शेजारी बांधण्यात



येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन, नगरसेविका सारिका अतुल भगत यांच्या नगरसेवक निधीतून खांदा कॉलनी येथील मूळगंधकुटी बुद्धीविहार समोर बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन, मा.नगरसेवक शंकर पाटील यांच्या नगरसेवक निधीतून कामोठे येथील सेक्टर ५ गार्डन बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन, नगरसेविका कमल महादेव कदम यांच्या नगरसेवक निधीतून कळंबोली शहरातील के.ग्रुप मैदान, सेक्टर ३, सी.ग्रुप

.../२

## नगराध्यक्ष शिवसेनेकडेच! कौन बनेगा उपनगराध्यक्ष? पोलादपूर नगरपंचायत अध्यक्ष उपाध्यक्ष निवड आज

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या निवडणुकीनंतर शिवसेना १० कॉंग्रेस ६ आणि भाजप १ असे पक्षीय बलाबल दिसून येत असताना नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष पदासाठीची निवडणूक आज १० फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी होणार आहे. निवडणुकीपूर्वीपासून महाआघाडीचा पॅटर्न होता होता राहिला असताना आता निवडणुकीनंतर सत्त–ास्थापनेवेळीतरी महाआघाडीचा पॅटर्न अस्तित्वात येणार आहे अथवा कसे, याबाबत सर्वत्र उत्सुकता निर्माण झाली आहे. अचानक नगराध्यक्षपदाच्या कॉंग्रेस आघाडीच्या उमेदवार आशा गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज बुधवारी मागे घेतला असून चोळईतील व्हाईट हाऊसमध्ये शिवसेना आणि कॉंग्रेसचे नेते एका कारखान्याच्या विस्तारीकरणासंदर्भात एकाच व्यासपिठावर आजच येणार असल्याने महाआघाडीच्या सत्तास्थापनेची ही नांदी मानली जात आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसंदर्भात कॉंग्रेसतर्फे आशा सचिन गायकवाड आणि शिवसेनेतर्फे सोनल प्रकाश गायकवाड यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. यापैकी बुधवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास आशा गायकवाड यांनी नगराध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने गुरूवारी ही निवड बिनविरोध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मात्र, गुरूवारी याच दरम्यान कॉंग्रेस व शिवसेनेचे नेते चोळईतील सुवर्णवर्ख कारखान्याच्या

.../२

# लोकसभा की प्रचारसभा?

संसदेच्या अधिवेशनाचा आरंभ राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होतो, तेव्हा त्यावर आणि त्या निमित्ताने अनेक राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होते. या चर्चेतील दोन भाषणे महत्त्वाची असतात. एक विरोधी पक्षनेत्यांचे आणि दुसरे, चर्चेला उत्तर देणाऱ्या दोन्ही सभागृहांच्या नेत्यांचे. लोकसभेत विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेचा सूर निश्चित करावा, अशी अपेक्षा असते. सध्या लोकसभेला विरोधी पक्षनेताच नाही. तेवढी संख्या एकाही विरोधी पक्षाकडे नाही. शिवाय, काँग्रेसचे गटनेते अधीररंजन चौधरी हे वारंवार गांभीर्य सोडणारे खासदार आहेत. अशा वेळी, राहुल गांधी यांनी अतिशय प्रभावी भाषण केले. लोकसभेतील चर्चेला पंतप्रधानांनी उत्तर देणे अपेक्षित होते. तसे त्यांनी ते सोमवारी दिले; मात्र राज्यसभेत सभागृह नेत्याने उत्तर देण्याऐवजी, तेथेही मंगळवारी पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच उत्तर दिले. राज्यसभेचे सभागृह नेते पीयूष गोयल यांना ही संधी न देता, केवळ मंत्रिमंडळाचे प्रमुख म्हणून मिळणारी संधी वापरून मोदींनी राज्यसभेतही भाषण करावे, हे आश्चर्यकारक आहे. दोन्ही सभागृहांमध्ये त्यांनी मांडलेले काही मुद्दे समान होते. काँग्रेसवरील हल्ला त्यांनी राज्यसभेत अधिक तीव्र केला. त्यांच्याच भाषेत, 'पुढच्या शंभर वर्षांत काँग्रेसला सत्ता मिळणार नसेल,' तर मोदींनी संसदेत ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे आदींना सोडून काँग्रेसलाच लक्ष्य करावे, हेही नवलच आहे. नरेंद्र मोदी यांनी अनावश्यक आक्रमक केलेल्या या हल्ल्यात महाराष्ट्र काँग्रेस निष्कारणच सापडली आहे. करोनाच्या लाटेत उत्तर भारतातील श्रमिकांना काँग्रेसने मुंबईतून आपापल्या राज्यांत घालवले आणि त्यामुळे करोनाचा प्रसार देशभर झाला, हा मोदी यांचा आरोप अगदीच गैरलागू, अस्थानी व संपूर्ण सत्य सांगणारा नाही. पहिल्या लाटेत देशव्यापी टाळेबंदी जाहीर झाल्यानंतर, हातावर पोट असणाऱ्या श्रमजीवींच्या मनात भयाची लाट उठली आणि ते मिळेल त्या मार्गाने आपले गाव गाठू लागले. तेव्हा त्यांना मदत करण्यात सर्व राजकीय पक्ष हिरीरीने पुढे आले होते. त्यात भारतीय जनता पक्षही होता. त्या काळातील समाजमाध्यमे किंवा वृत्तपत्रे पाहिली, तर या हजारो-लाखो श्रमजीवींना वाहने, जेवण, तिकिटे, मदत देण्यात सारे कसे पुढे होते, हे दिसते. तेव्हा या श्रमिकांनी गावी परतू नये असे वाटत होते, तर तसे कसून प्रयत्न निदान मोदींच्या पाठिराख्यांनी तरी करायला हवे होते. महाराष्ट्रात तीन पक्षांचे सरकार असताना, एकट्या काँग्रेसला लक्ष्य करावयाचे आणि त्याच सरकारचे परमाचार्य शरद पवार यांच्यावर स्तुतिसुमने उधळायची, हे एखाद्या प्रचारसभेत शोभून दिसेल. लोकसभेसारख्या लोकशाहीच्या सर्वोच्च व्यासपीठावर नाही. हे भान ना आधीच्या वक्त्यांनी ठेवले; ना त्यांना उत्तर देताना मोदींनी पायरी उतरण्याचे टाळले. देशातल्या काही राज्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांचा प्रचार लोकसभेच्या व्यासपीठावरून खुबीने करण्यात चातुर्य दिसत असेल; मात्र ते संसदेची प्रतिष्ठा वाढविणारे असेल का? गोव्यातील निवडणुका, हृदयनाथ मंगेशकर या मूळ गोवेकरावर 'आकाशवाणी'ने घातलेले निर्बंध आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांची गीते हे सारे नीट जुळवून आणले होते. हे प्रकरण अनेकदा चर्चिले गेले आहे; पण ते आज सांगण्याला विशेष अर्थ होता ना. पंडित नेहरू यांच्या लाल किल्ल्यावरील भाषणाचा संदर्भही मोदी यांनी दिला. तो ऐकून 'पंडित नेहरू गोवा स्वतंत्र करण्यास फारसे उत्सुक नव्हते,' असा नक्कीच समज होतो; मात्र गोव्यात भारतीय सैन्याने लष्करी कारवाई केली, तेव्हा पंडित नेहरू हेच पंतप्रधान होते. इतिहासातले असे सारे संदर्भ तपासणे आणि त्यांचा नीट अन्वय लावणे, हे अभ्यासकांचे काम असते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गोवा भारतात विलीन होण्यास पुढची १३ वर्षे का लागली, हा प्रश्न अनुचित नाही. तसा तो विचारला गेलाच पाहिजे; मात्र गोव्याची विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना, लोकसभेचे व्यासपीठ वापरून, काँग्रेसने गोवा मुक्तीत चालढकल केली, असा आरोप करणे म्हणजे प्रचारच नाही का? मोदींनी महाराष्ट्राचा जो संदर्भ दिला, त्यावरही तिन्ही सत्ताधारी पक्षांनी एकत्र येऊन उत्तर दिलेच नाही. 'दर वेळी मीच बोलायचे का,' असा प्रश्न काही बोलभांड नेत्यांना पडला, तर राज्यभर निषेध करण्यात काँग्रेसच्या सोबत इतरही दोन पक्ष आहेत की नाहीत, हे समजले नाही. एकाच वेळी उत्तर प्रदेश, गोवा आणि मुंबई महापालिकेचे मतदार यांना उद्देशून बोलण्याचे कसब, हा वक्तृत्वकलेचा नमुना असू शकतो; पण पक्षीय मतभेद विसरून, साऱ्या देशाला एका उंचीवरून संबोधित करणाऱ्या राजनीतिज्ञाचे उदाहरण ते कसे होईल? राष्ट्रपतींचे अभिभाषण हा संसदीय प्रथांमधला कुळाचार गेल्या काही वर्षांत नंतरच्या चर्चा, सभात्याग आणि उथळ भाषणे यांच्यामुळे डागाळत आहे. तोच क्रम दोन दिवस चालू राहिला.

# अज्ञात चोरट्यांनी केला चेतक कंपनीचा जवळपास दिडलाखाचा मुद्देमाल लंपास

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवसेकर**

**उतेखोल/माणगाव** : माणगांव जवळील विंचवली गावाच्या हद्दीत चेतक इंटरप्रायझेस कंपनी कडून हायवे रोड बनविण्याचे काम सुरू आहे. रोड बनविण्या करिता आणलेला माल साईट वरून कोणीतरी अज्ञात इसमांनी स्वतःचे फायद्या करीता लबाडीने चोरी केल्याची घटना मंगळवार दि. ८ फेब्रुवारी २०२२ रोजी रात्री ३.१५ वाजताच्या सुमारास घडल्याची तक्रार माणगांव पोलिस ठाणे येथे नोंद करण्यात आली आहे.

यामध्ये चोरट्यांनी साईटवरील स्टील, शटरिंग प्लेट, डायफ्रॅगम इंड प्लेट, चॅनल, चाळी असे एकुण रुपये १,४४,६९०/-किंमतीचा चेतक कंपनीचा माल लंपास केला आहे. चॉकलेटी रंगाचा आयशर क्र. एम. एच. ४७ वाय ६६५० हा टेम्पो अज्ञात इसमांनी चोरी करिता वापरला आहे. माणगांव पोलिस ठाणे येथे कॉ. गु. रजि. नं. भा.दं.वि. सं कलम ३७९ ने नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पो.नि. आर. पी. पाटील यांच्या मार्गदर्शना खाली सहा.फौज.एस.जी.भोजकर हे करत आहेत.

# माता रमाई आंबेडकरांचा त्याग नजरेत ठेऊन प्रत्येकाने जीवनात वाटचाल करावी : सारिका शिंदे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

माता रमाई आंबेडकरांचा त्याग नजरेत ठेऊन प्रत्येकाने जीवनात वाटचाल करावी असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या सारिका महेश शिंदे यांनी केले.

सम्यक क्रांती विचार मंचच्या वतीने माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माता रमाईंच्या जीवनावर मान्यवरांनी मौलिक विचार मांडले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक आंदोलन , लढा व चळवळीत रमाई मातेची अनमोल साथ लाभली. रमाई मातेचा त्याग, कष्ट व समर्पण कधीही विसरता येणार नाही. रमाई मातेने जे दुःख भोगले जगात असे दुःख व वेदना कुणाच्याही वाट्याला आले नसावे. औषध व उपचारावाचून पोटची चार अपत्ये रमाई मातेने गमावली. कोट्यवधी दिंनदुबळ्यांच्या जीवनात सोनेरी पहाट यावी याकरिता डॉ.बाबासाहेबांच्या साथीने माता रमाई झटत होत्या.

रमाई मातेचे आपल्यावर अनंत उपकार असून ते ऋण कधीही फेडता येणार नाही. आज आपला जो थाट माट आहे याच्या पाठीमागे रमाई बाबासाहेब यांचा त्याग, कष्ट व योगदान दडलेले आहे. असे मनोगत यावेळी सारिका महेश शिंदे यांनी व्यक्त केले. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञासूर्याची सावली बनून रमाई मातेने संपूर्ण हयात प्रचंड त्याग व समर्पण केले. माता रमाईने आपल्या पतीच्या ध्येय साधनेसाठी सतत दारिद्र्याशी संघर्ष केला .रमाई पहाटे उठून शेणाच्या गोवऱ्या थापायच्या, सायंकाळी परत येताना सरपणासाठी मोळी विकून आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करायच्या. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते. याचं जातिवंत उदाहरण म्हणजे माता रमाई. असल्याचे अशोक कांबळे म्हणाले. त्यागाला समानार्थी शब्द म्हणजे रमाई. ज्यांच्या त्यागामुळे कोटी-कोटी हीन -दिन दुबळ्यांचा अश्रू नष्ट झाले. व माणूस म्हणून जगता आले . रमाईचा त्याग नजरेत ठेऊन प्रत्येकाने वाटचाल करणे हेच रमाई मातेला खरे अभिवादन असे प्रतिपादन मंगेशभाऊ वाघमारे यांनी केले. यावेळी परळी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य महेश ठाकूर, बाळू करले, अनिकेत वाघोस्कर, माणगाव बुद्रुक ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक कांबळे, माणगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सदस्या सानिया संदीप मानकर, सारिका महेश शिंदे, नीलम महेश देशमुख, नंदा मधुकर कदम, संतोषी विजय दळवी, सुषमा प्रमोद देशमुख, दिपाली सागर ढोकळे, रंजना रविंद्र कांगणे, गणपत नामदेव दळवी, मंगेश राघो गाऊडसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


## म्हसळा नगरपंचायत म्हसळा

mhasalanagarpanchyat@gmail.com 02149-232245

### जाहीर आवाहन

म्हसळा नगरपंचायतीस केंद्र शासनामार्फत 'हागणदारी मुक्त शहर' असा दर्जा प्राप्त झालेला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ च्या निकषानुसार म्हसळा शहरात हागणदारी मुक्त प्लस (ODF0++) असल्याचा प्राथमिक ठराव पारिक केलेला आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र शासनामार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ च्या निकषानुसार घनचकरा व्यवस्थापनाकरिता कचरामुक्त शहरांचे तारांकित मानांकन प्रस्तावित असून यामध्ये घनकचरा संकलन, स्त्रोत वर्गीकरण, कचरा प्रक्रिया इ. बाबींचा समावेश असून याबाबत म्हसळा नगरपंचायत सर्वसाधारण सभा (ठराव क्र.८१, दिनांक २१/०१/२०२२) अन्वये ठराव पारिक करून, म्हसळा नगरपंचायत तीन स्टारकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर कररीत आहे. तरी उपरोक्त वरील विषयाबाबत कोणत्याही हरकती किंवा आक्षेप असल्यास दिनांक १७/०२/२०२२ सायं. ६ पर्यंत म्हसळा नगरपंचायत कार्यालयात लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

जा.क्र.९५७०१/म्हनप/२०२१-२२
म्हसळा नगरपंचायत कार्यालय, म्हसळा
जिल्हा-रायगड, दिनांक : ०९/०२/२०२२

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**म्हसळा नगरपंचायत**

**सही/-**
**प्रशासक**
**म्हसळा नगरपंचायत**



## Government of Maharashtra
## Range Forest Office Phansad (Wildlife) Sanctuary

At.New Mazgaon (Kasgaon), Post-Mazgaon, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad
Email : rfophansad@gmail.com

### Tender Notice No.03/2021-22

**Range Forest Officer-Phansad (Wildlife) Sanctuary invites proposals from interested Civil Contractors to participate in the competitive bidding process of B-1 Tendering to-**

| Sr.No. | Work Description | Work Cost |
|---|---|---|
| 1 | Special Repairs to Tower 01 Ghadgyacha Mal Round Kashid beat Danda (PWS) Phansad (Wildlife) Sanctuary Tal-Murud, Dist-Raigad | 265767/- |
| 2 | Special Repairs to Tower 02 Ghunyacha Mal Round Sud-koli Beat Supegaon (PWS) Phansad (Wildlife) Sanctuary Tal-Murud, Dist-Raigad | 258100/- |

B-1 Tender submission would be offline and the deadline to submit the proposals is 16/02/2022 at 5.00 PM. only.

(Blank B-1 Tenders forms are available at Range Forest office Phansad for Rs.250/- each (12% GST Extra) From 10.00 AM On 10/02/2022 to 16/02/2022 up to 3:00 PM.)

**Sd/-**
**Range Forest Officer**
**Phansad (Wildlife) Sanctuary**


# कळंबोली स्टील मार्केट येथील एसी कंटेनरला आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली स्टील मार्केट येथील भंगारात असलेल्या एका कंटेनरला अचानकपणे आग लागल्याची घटना आज घडली आहे सदर आगीच्या लपेटण्यात आजूबाजूची झाडे आल्याने वृक्षराई चे मोठे नुकसान झाले आहे. सदर आगीमुळे परीसरातील लोकांची धअवपळ झाली व त्यांनी तातडीने अग्नीशमदलाला पाचरण करुन त्यांनी ही आग आटो्नयात आणली परंतु गेल्या काही दिवसांपासून आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने आगीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.


## जाहीर नोटीस

साई निवास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पत्ता : शिलोत्तर रायचुर, सुकापूर, पनवेल, ता.पनवेल, जिल्हा : रायगड या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / गाळा क्र.५, धारण करणाऱ्या श्रीमती. निलीमा किशोर चांदवडे यांचे दि.०४/०३/२०१७ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही.

संस्था या नोटीसीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत.

ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पृष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रति व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणीही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंद व उपविीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष यांच्याकडे गाळा नं.८ येथे सकाळी / दुपारी १०.०० ते संध्याकाळी ०४.०० पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०२/२०२२

**सही/-**
**साई निवास सहकारी गृहनिर्माण संस्था म.**
**यांच्याकरिता आणि वतीने**
**सचिव**
**(भुषण सदानंद फुंडे)**


# उरण तालुका काँग्रेस तर्फे बॅ.अंतुले यांना आदरांजली

**दै.रायगड नगरी । उरण**

कोकणचे भाग्यविधाते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय बॅरिस्टर ए आर अंतूले यांच्या जयंती निमित्त उरण तालुका काँग्रेस पक्षातर्फे काँग्रेस कार्यालय उरण शहर येथे बॅरिस्टर ए आर अंतूले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, शहराध्यक्ष प्रकाश पाटील, सेवादल अध्यक्ष कमळाकर घरत यांनी बॅरिस्टर अंतूले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या आठवणींना आपल्या मनोगतातून उजाळा दिला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोना हा काँग्रेस मुळे वाढला आहे असे वक्तव्य केले होते या वक्तव्याचा यावेळी निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मोदी यांचा भरपूर समाचार घेतला. कोकण विभाग अल्पसंख्यांक उपाध्यक्ष अमरीन मुकरी, मच्छिमार नेते मार्तंड नाखवा ,रायगड जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा सरचिटणीस -गणेश सेवक,रायगड जिल्हा युवक काँग्रेस सरचिटणीस -जितेश म्हात्रे, अल्पसंख्यांक रायगड जिल्हाध्यक्ष अकलाख शिलोत्री, ओबीसी सेल रायगड जिल्हाध्यक्ष -उमेश भोईर, जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, तालुका कार्याध्यक्ष चेतन पाटील, महिला तालुकाध्यक्ष रेखा घरत, तालुका उपाध्यक्ष निर्मला पाटील,उरण तालुका सरचिटणीस नदाफ अकबर आदी काँग्रेसच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बॅरिस्टर अंतूले यांना आदरांजली वाहिली.


## पनवेल महानगरपालिका

**दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान** (DAY-NULM)

### फेरीवाल्यांसाठी जाहीर आवाहन

पनवेल महानगरपालिकेद्वारे दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत ''नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य'' या उपांगाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व (स्थिर, फिरते व तात्पुरते) फेरीवाल्यांचे सर्वेक्षण दिनांक २०/११/२०१९ रोजी सुरू करण्यात आले आहे. परंतु कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तसेच विषाणूची लागण पनवेल महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात नागरिकांना होवू नये यासाठी काही कालावधी करिता सर्वेक्षणचे काम बंद करण्यात आले होते. आता पुन्हा उर्वरित सर्वेक्षणाचे काम पनवेल महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात येणार आहे. आत्तापर्यंत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ७४५० फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. व त्यापैकी ३११७ फेरीवाल्यांनी संबंधित कागदपत्रे पमपाकडे जमा केली आहे. तरी ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण बाकी राहिले आहे त्यांनी त्वरित सर्वेक्षण करून घ्यावे व खालील नमूद केलेली कागदपत्रे सादर करावेत.

| अ.क्र. | फेरीवाला म्हणून नोंदण करण्यासाठीचे पात्रता निकष | अ.क्र. | सर्वेक्षणासाठी फेरीवाल्यांकडे आवश्यक असणारे कागदपत्र |
|---|---|---|---|
| १ | फेरीवाला भारतीय नागरिक असावा. | १ | आधारकार्ड (फेरीवाल्याने आपला आधार नंबर त्याच्या मोबाईल नंबर सोबत जोडून घेणे आवश्यक आहे.) |
| २ | फेरीवाला महाराष्ट्रातील अधिवासी असावा. | २ | तहसीलदार यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल सर्टीफिकेट) |
| ३ | सर्वेक्षणाच्या दिनांकास फेरीवाल्याचे वय १६ वर्षापेक्षा कमी असणार नाही | ३ | रेशनकार्ड (शिधापत्रिका) |
| ४ | पथविक्री खेरीज उपजिवीकेचे इतर कोणतेही साधन असणार नाही | ४ | जातीचे प्रमाणपत्र (SC, ST, MINORITY) आदी प्रवर्गातील असल्यास |
| | | ५ | दिव्यांग प्रमाणपत्र (दिव्यांग असल्यास) |
| | | ६ | विधवा असल्यास (पतीचे मृत्यू प्रमाणपत्र) |
| | | ७ | परित्यक्त्या, किंवा घटस्फोटीत असल्यास (प्रमाणीकरण कागदपत्र) |
| | | ८ | पासपोर्ट आकाराचा फोटो-२ |

वरील दर्शविलेली सर्व मुळ कागदपत्रे सर्वेक्षणामध्ये प्रथम नोंदणी झाल्यानंतर ०७ दिवसाच्या आत पनवेल महानगरपालिका, पनवेल येथील शिवाजी चौक, कै.विलासराव देशमुख व्यापारी संकुलातील पहिला मजला प.म.गाळा क्र.११४ येथे कागदपत्रे स्कॅनिंग करिता द्यावीत व एक साक्षांकित केलेली प्रत सादर करावी. उपरोक्त उल्लेखित सर्व कागदपत्रे फेरीवाल्यांनी तात्काळ तयार ठेवावीत व आपला आधार नंबर मोबाईल नंबरला जोडला नसल्यास अधिकृत आधार केंद्रातून तात्काळ जोडणी करून घ्यावा. पनवेल महानगरपालिकेतील फेरीवाल्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झालेले नाही त्यांनी सर्वेक्षण करून घ्यावे. तसेच ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झालेले आहे परंतु कागदपत्रे सादर केलेली नाहीत अशा सर्व फेरीवाल्यांनी लवकरात लवकर कागदपत्रे जमा करावीत. सबब सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर ज्या फेरीवाल्यांनी संबंधित कागदपत्रे सादर केली आहेत. अशा फेरीवाल्यांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येवून त्यांना फेरीवाला असल्याचे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात येतील. ज्या फेरीवाल्यांकडे ओळखपत्र व प्रमाणपत्र असेल त्यांनाच अधिकृत फेरीवाला म्हणून व्यवसाय करणेची परवानगी देण्यात येईल, याची सर्व फेरीवाल्यांनी नोंद घ्यावी.

पममा/DAY-NULM/SUSV २४२१/प्र.क्र./१६/११४/२०२१
दिनांक : ०९/०२/२०२२

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल न्यायालय परिसरातील वाहतूक कोंडी फुटणार

वाहनांना अडथळा होण्याचे अनेक प्रसंगही घडतात. या अनुषंगाने नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशानुसार, या मार्गावर चारचाकी वाहनांना पार्किंग करण्यासंबंधी सक्त मनाई करण्यात आली आहे. तर दुचाकींना सम-विषम नियमाने वाहने पार्किंग करणे बंधनकारक आहे.

पनवेल शहरातील जिल्हा सत्र न्यायालय हे लोखंडीपाडा व अशोकबाग यांच्यामधुन पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणा-या रस्त्यावर आहे. तसेच जिल्हा सत्र न्यायालय हे पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणावर आहे. पनवेल न्यायालय सध्या कार्यरत असलेल्या रस्त्याची अंदाजे लांबी १५० मीटर व अंदाजे रुंदी ४० फुट इतकी आहे. कोर्ट परिसरात आजुबाजुला खाजगी हॉस्पीटल, पोलीस उप आयुक्त कार्यालय, तालुका पोलीस ठाणे इत्यादी महत्वाची शासकीय कार्यालये आहेत. तर न्यायालयाच्या समोरील बाजुस निलपार्क, शितल, गुरुकुल व पवन अशा चार रहीवाशी सोसायटया देखील आहेत. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे अडचणींचा सामना करावा लागत होता.

## नगरसेवक निधीतून बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते भूमिपूजन

मैदान, सेक्टर ३ व छत्रपती शिवाजी महाराज राजे मैदान, सेक्टर २ ई येथे बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन व सेक्टर २ हनुमान मंदिर येथे बांधण्यात येणाऱ्या पाणपोईचे भूमिपूजन, नगरसेविका प्रज्योती प्रकाश म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून टेंभोडे बस स्टॉप शेजारी, नवीन पनवेल सेक्टर ६, खिडुकपाडा, साई मंदिर शेजारी व आसूडगाव शाळेचा मैदान येथे बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन, नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या नगरसेवक निधीतून तोंडरे, विठ्ठल रखुमाई मंदिर शेजारी बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमिपूजन पार पडले.

यावेळी विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील, पनवेल अर्बन बँक संचालिका श्रीमती.माधुरी गोसावी, नगरसेवक गोपाळ भगत, कामगार नेते प्रकाश म्हात्रे, नगरसेवक सखाराम पाटील, मा.नगरसेवक शंकर म्हात्रे, मा.नगरसेवक प्रमोद भगत, मा.नगरसेवक डी. पी.म्हात्रे, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, नगरसेविका सौ.कुसुम पाटील, नगरसेविका सौ.कमल महादेव कदम, नगरसेविका सौ.प्रीती जॉन्सन जॉर्ज, नगरसेविका सौ. सारिका अतुल भगत, नगरसेविका सौ.उज्वला विजय पाटील, नगरसेविका सौ.प्रिया विजय भोईर तसेच शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते, जेष्ठ नागरिक, महिला मंडळ व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## पोलादपूर नगरपंचायत अध्यक्ष उपाध्यक्ष निवड आज

विस्तारिकरणाच्या समारंभामध्ये एकाच व्यासपिठावर येणार असल्याने नगराध्यक्षपदानंतर होणारी उपनगराध्यक्षपदाची निवडणूकदेखील बिनविरोध होण्याची चिन्हे दिसून येत असून कदाचित काँग्रेसच्या उमेदवाराची वर्णी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, पोलादपूर काँग्रेसकडे राष्ट्रवादी काँग्रेसकडून आघाडीतून निवडणूक लढल्यानंतर एकही उमेदवार निवडून न आल्याने स्विकृत सदस्यपदाची कोणाच्याही नावाची शिफारस न करता मागणी केली असल्याचे तालुकाध्यक्ष अजय सलागरे यांनी सांगितले असून याबाबत कोणताही निर्णय झाला नाही.

निवडणुकीचे पडघम वाजायला लागल्यानंतर प्रस्तुत प्रतिनिधीने पोलादपूर नगरपंचायतीमध्ये निवडणुकीनंतर महाआघाडीची सत्ता येण्याच्या शक्यतेचे सुतोवाच केले होते. शिवसेनेच्या काही जागांवर काँग्रेसने केलेले सहकार्य मतदानांची आकडेवारी स्पष्ट करीत असताना आता यापुढे महाआघाडीचा प्रयोग होण्याची शक्यता असून या महाआघाडीनंतर पोलादपूर नगरपंचायतीच्या सत्तास्थापनेचा प्रयोग महाड नगरपालिकेच्या निवडणुकीची रंगीत तालीम मानली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## डिकसल येथे माता रमाबाई आंबेडकर यांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील शांतीनगर डिकसळ येथे त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.रमाबाई महिला मंडळाच्या वतीने १२४ वी जयंती निमित्ताने रमाबाई आंबेडकर यांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली.

माता रमाबाई आंबेडकर यांची १२४ वी जयंती डिकसळ येथील शांतीनगर मध्ये रमाबाई महिला मंडळाच्या वतीने साजरी करण्यात आली. रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून माता रमाबाईंची मूर्तीची स्थापना भन्ते राहुल बोधी यांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी त्यांनी प्रवचन दिले. त्यावेळी बुद्ध उपासक प्रकाश गायकवाड,रमेश गायकवाड, महिला मंडळाच्या अध्यक्षा रेखाताई साळवी,ज्योत्स्ना गायकवाड, कल्पना हिरे, पुष्पलता गायकवाड, अंजना गायकवाड, गुलाब गायकवाड, सुजाता गायकवाड, संगीता गायकवाड, शोभा चव्हाण, स्वाती फाळे,आदी उपस्थित होत्या. मंडळाच्या रेखा गायकवाड यांनी प्रस्ताविकात माता रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनाचा आढावा घेतला आणि कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. याप्रसंगी उमरोली ग्रामपंचायत माजी सरपंच मोनिका साळोखे,माजी उपसरपंच भारती पाटील, डिकसळ येथील पोलीस पाटील सरिता शेळके,आशा सेविका मीनाक्षी गायकर, वृषाली भोईर यांची प्रमुख उपस्थिती होती.भारतीय बौद्ध महासभेचे पी एस गायकवाड,मधुकर रोकडे, हिराबाई हिरे,शारदा वाघमारे, काशिनाथ गायकवाड, शंकर हिरे , उल्हास जाधव, गुलाब शिंदे, सुभाष गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे उपजिल्हाध्यक्ष हरिश्चंद्र यादव, तालुकाध्यक्ष धर्मेंद्र मोरे, सुनील गायकवाड, अजिंक्य हिरे, प्रफुल फाले, अँड उत्तम गायकवाड, रायगड भूषण किशोर गायकवाड उपस्थित होते.


# ५५० फूट अवघड कुंडलिका सुळक्यावर पडले तिसरे पाऊल

## मॅकमोहन हुले व टीमने सर करून फडकविला तिरंगा

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : सुधागड तालुक्यातील प्रसिद्ध गिर्यारोहक व प्रस्तरारोहक मॅकमोहन हुले यांनी आपल्या गिर्यारोहक मित्रांसोबत पाटणूस गावाजवळील कुंडलिका सुळका नुकताच सर करून ५५० फुटावर भारताचा तिरंगा फडकविला. या मोहिमेसाठी टीमला 'छू लेंगे आसमान' हे नाव दिले गेले. ही अवघड मोहीम दोन दिवस चालली. या कठीण सुळक्यावर आत्तापर्यंत अवघ्या तीन मोहीम झाल्या असून मॅकमोहन यांच्या टीमने ही तिसरी मोहीम फत्ते केली आहे.

कुंडलिका सुळका मोहिमेच्या आधी विजय वर्धन इंद्रनील खुरंगुळे, किरण बेकावडे व मॅकमोहन या गिर्यारोहकांनी या ठिकाणची पहिल्यांदा पाहणी (रेखी) केली, त्यानंतर मोहिमेची पूर्वतयारी केली गेली. सर्व साधन/तंत्र सामग्री जमवली व प्रजासत्ताक दिनी सकाळी सुळक्यावर चढाई केली. यावेळी अनेक आव्हाने प्रस्तरारोकांना अनुभवायला मिळाली. नियमित सराव असल्याने सुरक्षेची काळजी घेऊन या सुळक्यावरील अंतिम टप्पा मॅकमोहन, इंद्रनील खुरंगुळे, योगेश विरकर या प्रस्तरारोहकांनी भारताचा ध्वज तेथे फडकवला व ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत गायले. प्रजासत्ता दिनानिमित्त दिग्गजांच्या आव्हानांना साद घालता या टीमने पहिल्यांदाच हि खडतर मोहीम आखुन यश ही मिळवले व रितसर टीम चे ऊलेखन 'छू लेंगे आसमान' अस केले. या मोहिमेत इंद्रनील खुरंगुळे, मॅकमोहन हुले, मानतु मंत्री, कृष्णा बचुटे, योगेश विरकर, अक्षय शेलार, ओम काकडे, अभिजीत जोतकर, प्रशांत कुंभार, हे गिर्यारोहक सहभागी झाले होते.



# बॅ.अंतुले यांच्या जयंती निमित्त मोफत आरोग्य तपासणी

**दै.रायगड नगरी । उरण**

कोकणचे भाग्य विधाते, काँग्रेसचे जेष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री स्वर्गीय बॅरिस्टर ए आर अंतूले यांच्या जयंती निमित्त अमन पॉलीक्लिनिक व क्वीन्स केअरच्या माध्यमातून ठाकूर अपार्टमेंट शॉप नंबर २, यश मेडिकलच्या बाजूला, उरण शहर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन काँग्रेसचे अल्पसंख्यांक रायगड जिल्हाध्यक्ष अकलाख शिलोत्री यांनी केले होते. रुग्णांना मोफत ओपीडी सेवा देण्यात आली.

परिसरातील नागरिकांनी या आरोग्य सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. कोकण विभाग अल्पसंख्यांक उपाध्यक्ष अमरीन मुकरी, मच्छिमार नेते मार्तंड नाखवा, रायगड जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा सरचिटणीस –गणेश सेवक,रायगड जिल्हा युवक काँग्रेस सरचिटणीस –जितेश म्हात्रे, अल्पसंख्यांक रायगड जिल्हाध्यक्ष अकलाख शिलोत्री, ओबीसी सेल रायगड जिल्हाध्यक्ष –उमेश भोईर, जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, तालुका कार्याध्यक्ष चेतन पाटील, महिला तालुकाध्यक्ष रेखा घरत, तालुका उपाध्यक्ष निर्मला पाटील, उरण तालुका सरचिटणीस नदाफ अकबर, तालुकाध्यक्ष सेवा दल –कमळाकर घरत, तालुका उपाध्यक्ष सेवादल –जयवंत पडते, शहराध्यक्ष प्रकाश पाटील, शहर महिला अध्यक्ष अफशा मुकरी, युवक काँग्रेस उपाध्यक्ष उरण शहर –रविंद्र मढवी, शहर उपाध्यक्ष मोहन सिंह, उपसरपंच खोपटे –सुजित म्हात्रे, केगाव काँग्रेस गाव अध्यक्ष सदानंद पाटील आदी काँग्रेसच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी या आरोग्य शिबिरास भेट देऊन या शिबिराचे कौतुक केले. बॅरिस्टर अंतूले यांच्या जयंती निमित्त फ्री आरोग्य तपासणी, फ्री ओपीडीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अमन पॉलीक्लिनिकचे अब्रार शिलोत्री यांनी दिली.

# शुभ्रा प्रकल्पाच्या माध्यमातून स्थलांतरित विट कामगारांच्या मुलांना दैनंदिन गरजेच्या वस्तु वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील बिरदोले येथे राहणाऱ्या भाविका भगवान जामघरे या कॉलेज मध्ये शिकत असलेल्या तरूणीने सामाजिक बांधिलकी जपत दामत येथे विट भट्टी वर काम करणाऱ्या विट कामगारांच्या मुलांना तेथे जाऊन शिकवत असते या प्रकल्पाची माहिती भाग्यश्री वर्तक यांना हेमंत कोंडीलकर यांनी करून दिली असता त्या मुलांना आवश्यक असलेल्या वस्तुंचे वाटप करण्यात आले. शूभ्रा प्रकल्पाच्या माध्यमातून स्थलांतरित विट कामगारांच्या मुलांना खेळणी, दैनंदिन गरजेच्या वस्तुं, साबण, कोलगेट, ब्रश, बिस्कीट वाटप करण्यात आले.

या प्रसंगी शुभ्रा प्रकल्पाच्या संस्थापिका भाग्यश्री वर्तक, भाविका भगवान जामघरे, तिचे वडील भगवान जामघरे, सेंद्रिय शेतीतील यशस्वी प्रयोगशिल शेतकरी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त हेमंत कोंडीलकर रायगड भुषण, सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते दत्ता मसणे, अशोक गायकवाड, आदी मान्यवर उपस्थित होते.



---

राव सो

अॅड.रेखा होवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर पनवेल
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज

अर्ज क्र.१४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्री.निक्सॉन मायकल राज
वय : ५०
२) कु.कॅथरिन निक्सॉन राज
दोघेही रा.विवेक को.ऑप.हौ.सो.,
बी–१३, सेक्टर–९ ए, प्लॉट नं.४१, वाशी नवी मुंबई — अर्जदार

विरुद्ध

गॅब्रियल निक्सॉन राज
रा.दोघेही रा.विवेक को.ऑप हौ.सो.,
बी–१३, सेक्टर–९ ए, प्लॉट नं.४१, वाशी नवी मुंबई

ज्यापेक्षा कै.श्रीमती.Late Smt.Massila Tamil Selvi Nixon ह्यांचा मृत्यू दि.११/०६/२०२१ रोजी वाशी येथे झाला आणि अर्जदार हे कै. Late Smt.Massila Tamil Selvi Nixon यांचे पती व अर्जदार नं.२ ही मुलगी आहे व सामनेवाला हा मुलगा आहे. आणि वारस या नात्याने मयताचे मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल केला.

SHEDULE OF PROPERTY 'A'

Name of the Property Holder : Late Smt.Massila Tamil Selvi Nixon. Flat No.701, Plot No.12 B, Sector-8, Building known as Shelter Complex CHS. Tal-Panvel, Dist-Raigad admeasuring area 46.47 Sq Mt, Agreement value Rs.40,00,000/- (Forty Lakhs Only)

वारसाने सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध तारखेपासून एक महिन्याचे आत, ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखी नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदर यांचे मुजरात वारसाचे सर्टीफिकेट देईल.

तारीख ०९ माहे ०२ सन २०२२ बेलिफाकडे

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

राव सो

अॅड.रेखा होवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर पनवेल

अर्ज क्र.१३७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्रीमती.संगीता सिद्धार्थ कांबळे
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : काही नाही
२) रुपेश सिद्धार्थ कांबळे
वय : वर्षे, व्यवसाय :
३) अर्जुन सिद्धार्थ कांबळे
वय : १९ वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
४) सौ.अश्विनी विशाल खैरे
वय : , व्यवसाय :
रा.शांतीकुंज को.ऑप.सो.प्लॉट नं.१४ डी,
सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.चंद्राबाई भिकाजी कांबळे
२) राजेश सिद्धार्थ कांबळे
शांतीकुंज को.ऑप सो.प्लॉट नं.१४ डी,
सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत श्री.सिद्धार्थ भिकाजी कांबळे हे दि.१०/०६/२०२० रोजी खारघर येथे निधन पावले आणि अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ व ४ ही मुले आहेत. व सामनेवाल्या ह्या मयत श्री.सिद्धार्थ भिकाजी कांबळे ह्यांची आई आणि सामनेवाला नं.२ हा मुलगा आहे. यांनी त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

Name of the Property Holder Late Shri Sidharth Bhikaji Kamble Flat No. C-303, Shantikunj CHS, Plot No.14 D, Sector-4, Kharghar, Taluka-Panvel, Dist-Raigad, Agreement Value Rs.3,53,737/- (Rupees Three Lakhs Fifty Three Thousand Seven Hundred and Thrty Seven Only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख ०९ माहे ०२ सन २०२२ रोजी बेलिफाकडे

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, शेतकरी १) खादीजा इस्माईल खामकर २) श्री.मोहम्मद अली इस्माईल ३) श्रीमती. नईमा इस्माईल खामकर ४) शमी अे.रहमान खामकर ५) गुलामसाहब अे.रेहमान खामकर ६) मयत मुमताज अे.रहमान खामकर चे वारस १) गुलामसाहब अे.रेहमान खाामकर २) मो.शमी अे.रहमान खामकर ३) श्री.एम. अली इस्माईल खामकर ४) श्रीमती.नईमा इस्माईल खामकर सर्व रा.तळोजा पाचनंद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांच्याकडून मौजे : पेंधर, प्लॉट नं.युनिट केस नं.१६ प्रमाणे खालील वर्णन केलेली मालमत्ता वर नमूद शेतकऱ्यांकडून माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**मौजे : पेंधर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| पेंधर | १६ | १७७ | १+२ / C | ०–०३–० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिज, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**अॅड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

---

मा.गोडसे सो. कोर्ट

अर्जदाराचे वकील
अॅड.सचिन केणी / अॅड.राकेश केणी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सि.डी./ज्यु.डी.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५१७/२०२०
नि.नं.१०/ड
ने.ता.१०/०३/२०२२

१) श्री.गणेश मेघनाथ भोपी वय : ३८ वर्षे, धंदा : शेती २) श्री.नरेश मेघनाथ भोपी, वय : ३६ वर्षे, धंदा : शेती, ३) श्रीमती.अनिता मेघनाथ भोपी, वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी, ४) श्रीमती.कांता दशरथ भगत, वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी, सर्व रा.रिघट, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड–४१०२०६, ५) श्रीमती.भिमाबाई मेघनाथ भोपी उर्फ भिमाबाई शंकर चौधरी, वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.रुम नं.१८०, ए–१, दुंदरेपाडा, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.गोपीनाथ काळु भोपी, वय : ६५ वर्षे, धंदा : शेती, २) श्री.संभाजी काळु भोपी, वय : ६३ वर्षे, धंदा : शेती, ३) श्री.प्रकाश काळु भोपी, वय : ५५ वर्षे, धंदा : शेती, वरील सर्व रा.रिटघर, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड पिन–४१०२०६, ४) श्रीमती.सुनिता मधुकर ठाकूर, वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.मु./पो.धुतूम गाव, ता.उरण, जि.रायगड, सर्व रा.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी कै.काळु विठू भोपी हे दि.०८/१०/१९८७ रोजी मौजे : रिटघर, पनवेल, जि.रायगगड येथे मृत्यू पावले असून त्यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | नगर भूमापन क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ३९५ | ४६.८ |
| २ | ३९४/अ | १९.२ |
| ३ | ३९४/ब | १९.२ |

कै.काळु विठू भोपी यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार व सामनेवाला हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदर अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारस दाखला मिळण्यासाठी केलेला आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणर नाही.

आज तारीख ०९/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, शेतकरी श्री.मधुकर बाळया पाटील रा.पेंधर गाव, पोस्ट : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.९९३, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.१०८+१०९ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल १) श्री.रियाज ए रशीद खामकर २) श्री.सलमान अब्दुल लतीफ मदार राहणार : तळोजा पाचनंद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक ९९३ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | ०२ | १०८+१०९ | १४९.५६ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिज, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**अॅड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

---

मा.गोडसे सो. कोर्ट

अॅड.प्रणाली सोहनी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०५७/२०२१
नि.नं.८
ने.ता.१०/०३/२०२२

१) श्री.प्रकाश राघो कडव
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती व व्यापार
२) श्री.जयराम राघो कडव
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती व व्यापार
३) श्री.गुरुनाथ राघो कडव
वय : ७० वर्षे, धंदा : वकीली
४) श्री.सुरेश राघो कडव
वय : ६० वर्षे, धंदा : वकीली
अर्जदार नं.१ ते ४ सर्व रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ४ ह्यांचे वडील कै.राघो धाया कडव हे मौजे : कळंबोली, ता.पनवेल येथे दिनांक २६/१२/२०१२ रोजी मयत झाले असून त्यांची पत्नी कै.बच्चीबाई राघो कडव ह्या देखील दि.२१/२/२०२० रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल येथे निधन झाल्या आहेत. त्यांना अर्जदार १ ते ४ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

कै.राघो धाया कडव यांचे नांवे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**जमीन मिळकत**

**मौजे : नेवाळी, ता.पनवेल**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३+५ ब | ०–१६–२० | २.५९ |
| २ | ४९ | २+५ अ | ०–०८–८० | २.०० |

येणेप्रमाणे मिळकती असून कै.राघो धाया कडव यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळाव्यात याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.९/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपिल क्र.१३१/२०२०

१) श्रीम.बबुबाई आत्माराम पाटील
२) श्री.मोहन आत्माराम पाटील
३) श्रीम.सिताबाई नागा मोरे, रा.पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीम.गुणाबाई मोतीराम फडके
रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
५) तोयराम उर्फ राम आत्माराम पाटील
५/१) श्री.प्रितेश राम पाटील
६) आप्पा भुऱ्या पाटील
६/१) श्रीम.गंगुबाई अप्पा पाटील
६/२) श्री.नारायण अप्पा पाटील
सर्व रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्रीम.अनिता नाना पाटील, रा.वाकलन, ता.ठाणे, जि.ठाणे
८) श्रीम.सुनिता शाामराव गोंधळी
रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्रीम.संध्या संजय पाटील, रा.कुत्तरपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
१०) भिमाबाई एकनाथ पाटील मयत तर्फे वारस
१०/१) मयुर एकनाथ पाटील, रा.वलप, ता.पनवेल, जि.रायगड
१०/२) श्रीम.निर्मला राम भगत, रा.चिंचवली, ता.पनवेल, जि.रायगड
१०/३) श्रीम.मयुरी सतीश पाटील, रा.मोहो, ता.पनवेल, जि.रायगड
११) कानुबाई नारायण दाढावकर मयत वारस
११/१) श्री.विष्णू नारायण दाढावकर
११/२) श्री.भगवान नारायण दाढावकर
अ.क्र.११/१ व ११/२ रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
११/३) श्रीम.विठाबाई तुकाराम आदईकर
रा.कुत्तरपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
११/४) श्रीम.कमलाबाई गोपीनाथ जोशी, रा.पेठ, ता.पनवेल, जि.रायगड
११/५) श्रीम.फसुबाई गोविंद केणी, रा.पेठाली, ता.पनवेल, जि.रायगड
११/६) श्रीम.माईबाई काळुराम पाटील, रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
११/७) श्रीम.बेबीबाई बबन पाटील,
रा.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१) श्री.जनार्दन कुंडलिक पाटील
२) श्री.गणेश कुंडलिक पाटील
३) श्रीम.मुक्ताबाई बाळाराम म्हात्रे
४) श्री.अनिल राजाराम पाटील
५) श्रीम.चंद्रा शरद प्रदान
६) श्रीम.लिलाबाई राजाराम पाटील
७) श्रीम.रत्नाबाई कचरु पाटील
८) श्रीम.देवकी अनंत पाटील, रा.उसाटणे, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
९) श्री.भानुदास कचरु पाटील
१०) श्रीम.शांताबाई तुकाराम पाटील
११) श्री.रघुनाथ तुकाराम पाटील
१२) श्री.गोमेश तुकाराम पाटील
१३) श्री.विष्णू तुकाराम पाटील
१४) श्रीम.धर्मुबाई वामन पाटील
१५) श्रीम.वनिता हरिश्चंद्र पाटील, रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
१६) कु.शकुंतला राजाराम पाटील
१७) कु.पायल जनार्दन काळण
१८) श्रीम.फसुबाई बेंडू पाटील
१९) श्री.सुभाष बेंडू पाटील
२०) श्रीम.यमुना बेंडू पाटील
अ.क्र.१ ते ५, ७ ते ११ रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
२१) श्रीम.बारकी बेंडू पाटील, रा.नारिवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
२२) श्री.आशा संदीप भगत, रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२३) श्री.जोमा मारुती पाटील
२४) श्री.पांडुरंग मारुती पाटील
२५) श्री.अशोक मारुती पाटील
२६) श्री.हरिश्चंद्र मारुती पाटील
२७) श्रीम.अनुबाई हरिश्चंद्र पाटील, रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
२८) श्रीम.माईबाई कचरु दरे, रा.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड
२९) श्रीम.बेबीबाई गणपत पाटील
३०) श्री.मेघनाथ गणपत पाटील
३१) श्री.मच्छिंद्र गणपत पाटील
अ.क्र.१५ ते १८, २१ ते २३ रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
३२) श्रीम.लक्ष्मी दिनेश पोपेटा, रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
३३) श्रीम.निलम नरेश पाटील, रा.मोहो, ता.पनवेल, जि.रायगड
३४) श्रीम.सपना मदन म्हात्रे, रा.आसुडगांव, ता.पनवेल, जि.रायगड
३५) श्रीम.मनिषा राजाराम भोईर, रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
३६) श्री.शनिवार लक्ष्मण पाटील
३७) श्री.गोपाळ नामदेव पाटील
३८) श्री.गोविंद नामदेव पाटील,
अ.क्र.२८ ते २९ रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
३९) श्रीम.देवकाबाई अनंता भोईर, रा.पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड
४०) श्रीम.भागुबाई शांताराम पाटील, रा.वलप, ता.पनवेल, जि.रायगड
४१) मंडळ अधिकारी तळोजे
४२) तलाठी सजा तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड — उत्तरार्थी

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपिल

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.८२/१ क्षेत्र ०–६६–० आकार ६.४७, ८२/१ पै क्षेत्र ०–४६–० आकार ४.५४, ८२/१/पै/२ क्षेत्र ०–३६–० आकार ३.५६ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी याांनी या न्यायालयात दि.२५/११/२०२० रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.१६/०२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०३/०२/२०२२

**सही/–**
**अपर जिल्हाधिकारी करिता**

